जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सुधारित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१९/प्र.क्र.६७/आस्थापना (संवर्ग नियम),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १ ऑगस्ट, २०१९

**प्रस्तावना :-**

जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियांत्रिकी सेवा नियमांच्या पुनर्रचनेसंदर्भात श्री. बक्षी, तत्कालिन प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने दोन्ही विभागातील संरचनेबाबत शिफारशी शासनास सादर केलेल्या आहेत. तथापि, दोन्ही विभागातील कामकाजाचे स्वरुप, संवर्गनिहाय मंजूर पदसंख्या, पदोन्नतीबाबत असलेले वेगवेगळे निकष यामुळे समितीच्या शिफारशींबाबत सार्वजनिक बांधकाम व जलसंपदा विभागाने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १४.५.२०१९ रोजीच्या बैठकीत संवर्ग व्यवस्थापनाच्या दृष्टीकोनातून अभियांत्रिकी सेवेतील सेवाप्रवेश नियमांचे पुनर्विलोकन करुन त्यामध्ये कालानुरुप सुधारणा करुन आवश्यक त्या अधिनियमाच्या स्वरुपात प्रसिध्द करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. जलसंपदा विभागातील कामकाजाचे बदलते स्वरुप व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन तांत्रिक संवर्गातील अभियंत्यांची संवर्गनिहाय संरचना निश्चित करुन, संवर्गनिहाय अद्ययावत सेवाप्रवेश नियम तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :-**

जलसंपदा विभागातील कामकाजाचे बदलते स्वरुप व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन तांत्रिक संवर्गातील अभियंत्यांची संवर्गनिहाय संरचना निश्चित करुन, संवर्गनिहाय अद्ययावत सेवाप्रवेश नियम तयार करण्यासाठी विभागाच्या स्तरावर **सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग** यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे :-

(१) उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(२) उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(३) उप सचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(४) अवर सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(५) अवर सचिव (राकसे), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(६) अवर सचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य

(७) अवर सचिव (संनि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई :- सदस्य सचिव

२. समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

(१) जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियांत्रिकी सेवा नियमांच्या पुनर्रचनेसंदर्भात श्री.बक्षी, तत्कालिन प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या अहवालातील शिफारशी व विभागाची सध्याची संरचना आणि विभागातील कामकाजाचे बदलते स्वरुप व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन संवर्ग व्यवस्थापनाच्या दृष्टीने सर्व अभियांत्रिकी संवर्गाची संरचना सुनिश्चित करणे.

(२) उपरोक्त नमूद केल्यानुसार निश्चित केलेल्या संरचनेनुसार संवर्गनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करणे. यामध्ये मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता संवर्गातील निश्चित केलेले संवर्ग, सहायक अभियंता श्रेणी-२, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदांचा समावेश राहील.

(३) समिती आवश्यकतेनुसार महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक, मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांचे स्तरावरील अधिकाऱ्यास आमंत्रित सदस्य म्हणून निमंत्रित करु शकेल.

(४) समिती वरील विषयाशिवाय आवश्यकतेनुसार संवर्ग व्यवस्थापनाच्या दृष्टीने अन्य प्रस्तावांवर देखील अभ्यास करुन त्यावरील शिफारशी शासनास सादर करील.

(५) समितीने प्रस्तुत कार्यवाही १ महिन्यांत पूर्ण करावी.

३. समितीने एकूण संरचना निश्चित करुन संवर्गनिहाय सेवाप्रवेश नियम तयार केल्यानंतर यासंदर्भातील सामान्य प्रशासन विभाग व विधि व न्याय विभागाच्या मान्यतेने सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यपध्दती प्रचलित विषय वाटपानुसार कार्यासन आ(संनि) व कार्यासन आ(तांत्रिक/अतांत्रिक) यांचेमार्फत करण्यात येईल.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०८०११६५८३४००२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Arvind Vitthalrao Pagar

Digitally signed by Arvind Vitthalrao Pagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Arvind Vitthalrao Pagar
Date: 2019.08.0[illegible]

**(अरविंद वि. पगार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. मंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
४) सचिव (लाक्षेवि/प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
५) सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व समिती सदस्य.
८) निवड नस्ती/कार्यासन आस्थापना (संवर्ग नियम)